# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दिनांक ३०.१२.८९ रोजी झालेल्या ४५ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २. | श्री. अ. म. महाजन | उपसभापती औरंगाबाद मंडळ |
| ३. | श्री. जंबगी, कार्यकारी अभियंता | सदस्य[ आयुक्त म. न. पा, औरंगाबाद याचे प्रतिनिधी. |

विषय क्र. १: मंडळाच्या दिनांक ३०.११.८९ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

. . .

दि. ३०.११.८९ रोजी झालेल्या ४४ व्या सभेतील विषय क्र ३ व ठराव क्र. २२९ मध्ये अट क्र. २ काढण्यांत यावी व त्यामुळे प्राधिकरणाची व शासनाच्या मंजूरीची आवश्यकता नसल्यामुळे या ठरावातील शेवटचा परिच्छेद वगळण्यांत यावा.

त्यामुळे ठराव क्र. २२९ असा वाचावा.

यावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, वाळुज विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात मंडळास प्राप्त होणाऱ्या शासकीय जमिनीवर गृहनिर्माणाची योजना राबवावी व वाटप करतांना " वाळूज परिसरात नगरपालिका/महानगरपालिका अस्तीत्वात नसल्यामुळे वाळुज विशेष नियोजन प्राधिकरण या क्षेत्रात घर नसावे."

ठराव क्र. २३५

दिनांक ३०.११.८९ रोजी झालेल्या ४४ व्या सभेचा कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: लातुर, नंदुरबार व बीड येथील नगरपरिषदेकडून आलेल्या गलिच्छवस्ती सुधारणा योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

. . .२

ठराव क्र. २२६

लातूर नगरपरिषदेकडून आलेल्या १० गलिच्छवस्त्या सुधार योजनेच्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, नगरपरिषदेने जुन्या कामांना प्राधान्य देऊन नविन १० गलिच्छवस्त्यांच्या कामासाठी नगरपरिषदेने स्वत:च्या निधीतून खर्च करावा व जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून जसजसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून करण्यांत येईल.

प्रशासकीय मान्यता दिलेल्या गलिच्छवस्त्याचे नावे व प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. बीदरवेस-सिध्देश्वरवेस-माळीगल्ली | रु. ६,९३९८६/- |
| २. तेलीगल्ली-बोलेगल्ली | रु. ४,१६,४८५/- |
| ३. इंडियानगर | रु. ११,२०,८१०/- |
| ४. सिग्नल कॅंप हटस् | रु. १७,०२३८०/- |
| ५. हनुमंतवाडी | रु. ९,९९,३००/- |
| ६. मांगवाडी | रु. ९,९९,१४०/- |
| ७. सुतगिरणीच्या पश्चिमेकडील वस्ती | रु. १०,६८,७२० |
| ८. काझी मोहल्ला | रु. २,६८,९४०/- |
| ९. मंढाळेनगर झोपडपट्टी | रु. ३,८०,७५०/- |
| १०. श्रीकृष्णनगर झोपडपट्टी | रु. ३,६१,४८०/- |

---

नंदुरबार

नंदुरबार नगरपरिषदेकडून आलेल्या ४ गलिच्छवस्ती सुधार योजनेच्या अंदाजपत्रकावर मंडळाने सर्वकष चर्चा करून असा निर्णय घेतला की, नंदुरबार शहरासाठी ८९-९० या वर्षासाठी रु. २.५० लक्ष प्रस्तावीत आहे. त्यापैकी आतापर्यन्त ०.८७ लक्ष खर्च झाला असून नविन कामे हाती नसल्यामुळे व पुढील आर्थिक वर्षात नविन कामे सुरु करण्याचे दृष्टीने तसेच आर्थिक वर्षात संपूर्ण तरतुद खर्च करण्याच्या दृष्टीने नंदुरबार नगर परिषदेकडून आलेल्या खालील ग.व.सुधारणा कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

...३

| अ.क्र. | गलिच्छवस्तीचे नांव | प्रशासकीय मान्यता दिलेली रक्कम |
|---|---|---|
| १. | बंधारपाडा भिलाटी | रु. ७९,४९३/- |
| २. | भंगीवाडा-जुना बैलबजार-समता कॉलनी | रु. ३,५८,६७९/- |
| ३. | हाटीजवळील जुन्या पाण्याची टाकीकडील वस्ती | रु. ३,६२,९५४/- |
| ४. | मिशन चर्च जवळील हमालवाडा | रु. ८८,६२१/- |

बीड

नगर परिषदेने पाठविलेल्या गलिच्छवस्ती सुधारणेच्या प्रस्तावावर विचार करुन असा निर्णय घेतला की, बालेपीर व अशोकनगर-ढगे कॉलनी येथील योजनांची कामे नगर परिषदेने स्वत:च्या निधीतून करावे व नंतर उपलब्ध तरतुदीनुसार प्रतिपूर्ती करण्याच्या अटीवर अशोकनगर-ढगे कॉलनी व बालेपीर येथील अनुक्रमे रु. ८,६२,४९६ व रु. १२,१३,४८०/- च्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास मंडळाने मंजूरी दिली.

विषय क्र. ३:- १९८९-९० या आर्थिक वर्षाचे मंडळाचे सुधारीत अंदाजपत्रक व १९९०-९१ वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रके.

ठराव क्र. २३७

सन १९८९-९० या आर्थिक वर्षाचे मंडळाचे सुधारीत अंदाजपत्रक व १९९०-९१ या वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रकावर सखोल चर्चा होऊन मंडळाने सदर अंदाजपत्रकास मंजूरी दिली.

आयत्यावेळचा विषय

विषय क्र. १: विडी कामगारांसाठी औरंगाबाद, जालना, नांदेड, नासिक ह्या ठिकाणी घेतलेल्या गृहनिर्माण योजना व अनुदान मिळण्यामध्ये होणारा विलंब.

या विषयावर चर्चा करतांना मा. सभापतींनी विडी कामगारांच्या योजनेची माहिती देवली व अनुदान प्राप्त होण्यासाठी विडी कामगारांकडून आवश्यक असलेल्या कागदपत्राची पुर्तता करून घ्यावी अशी सूचना केली. चर्चेत भाग घेतांना उपसभापतींनी अशी माहिती दिली की, जालना येथील विडी कामगारांकडून कागदपत्राची पुर्तता करून अनुदान प्राप्त व्हावे म्हणून विडी कामगारांच्या नांवाच्या सविस्तर यादीसह प्रस्ताव प्राधिकरणातर्फे शासनाकडे पाठविला आहे. परंतु नांदेड, औरंगाबाद नासिक येथील विडी कामगारांकडून कागदपत्राची पुर्तता झालेली नाही व त्यांच्याकडून प्रतिसादही मिळत नाही. त्यामुळे अनुदान मिळण्यासाठी योग्य तो प्रस्ताव पाठविता येत नाही अशी माहिती उपसभापतींनी दिली.

ठराव क्र. २३८
------------

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, नांदेड, औरंगाबाद, नासिक येथील विडी कामगारांकडून कागदपत्राची पुर्तता करून घेण्यास एक महिन्याचा कालावधी द्यावा व प्रत्यक्ष विडी कामगारांशी संपर्क साधून त्यांच्याकडून आवश्यक ती कागदपत्रांची पुर्तता करून घ्यावी. अन्यथा, अनुदानाच्या रक्कमा सध्या गाळेधारकांनीच भराव्या लागतील अशा प्रकारे वर्तमानपत्रातून माहिती प्रसिध्द करावी.

. . .